सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥

या गीतेच्या श्लोकावरील

# प्रवचन

प्रा. सोनोपंत दांडेकर

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १२६९

REFBK-0017750

मत ८ आणे

यशवंत गोपाळ जोशी,
प्रसाद प्रकाशन, ६८९।२३ सदाशिव पेठ, पुणें २

REFBK-0017750

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २८५८३ विः निबंध
क्रमांक १२६७ नोंः दिः ४-१-६१

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥

( गीता १८–६६ )

प्रस्तुत प्रवचनाचा श्लोक हा गीतेच्या अठराव्या अध्यायांतील ६६ वा श्लोक आहे. या श्लोकाचें महत्त्व काय आहे, ज्ञानेश्वर-महाराजांनीं त्यावर काय टीका लिहिली आहे, हें सांगण्यापूर्वी मी प्रथमतः या श्लोकाचा धांवता भावार्थ सांगतों, तो असा:— भगवंत म्हणतात ‘ ( हे अर्जुना ! ) ’ ‘ माम् एकं शरणं व्रज ’ म्ह० ‘ तूं मला एकट्याला शरण ये. ’ ‘ माम् एकं ’ ह्याचा अर्थ, ‘ सर्वात्मा, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान्, सर्वभूतस्थ असा जो ईश्वरस्वरूप मी, अशा मलाच एकाला म्ह० ईश्वराला ’ ( तूं शरण ये ). परंतु कसा शरण येशील ? तर ‘ सर्वधर्मान् परित्यज्य ’ म्ह० ‘ सर्व धर्मांचा परित्याग करून ’. येथें ‘धर्म’ या शब्दानें ‘ अधर्माचेंहि ’ ग्रहण करावयाचें आहे. तेव्हां ‘ सर्व धर्म व अधर्म या दोहोंचाहि त्याग करून ’ ( तूं केवळ मलाच शरण ये ). अशा प्रकारें तूं मला शरण आलास कीं, ‘ अहं त्वा सर्वपापेभ्यः मोक्षयिष्यामि ’ म्ह० ‘ मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन ’. यास्तव ‘ मा शुचः ’ म्ह० ‘ तूं शोक करूं नकोस ’. तात्पर्य, “ ( अर्जुना ), सर्वधर्म-

परित्यागपूर्वक तूं मला एकट्याला शरण ये म्हणजे मी तुला सर्व पातकांपासून मुक्त करीन. म्हणून तूं शोक करूं नकोस " असा ह्या श्लोकाचा थोडक्यांत भावार्थ आहे.

या श्लोकास अनेक दृष्टींनीं महत्त्व असल्यामुळें हा गीतेंतील एक अत्यन्त महत्त्वाचा श्लोक आहे. सामान्यतः प्रवचनास घेतलेला प्रत्येक श्लोक महत्त्वाचा आहे, असें सांगण्यांत येतें. यामुळें एकादशी महात्म्यांत ज्याप्रमाणें प्रत्येक एकादशी महत्त्वाची आहे, असें सांगितलें जातें त्यापैकींच हा एक प्रकार आहे, असें वाटण्याचा संभव आहे. परंतु ज्याप्रमाणें हिऱ्याला वेगवेगळे 'पैलू' असतात, तसेंच श्लोकालाहि वेगवेगळ्या दृष्टीनें महत्त्व असूं शकतें. तेव्हां प्रस्तुत श्लोकाचें महत्त्व काय आहे, ह्याचा आपण प्रथमतः विचार करूं व नंतर श्लोकाच्या अंतर्भागाकडे वळूं.

या श्लोकास महत्त्व असण्याचें पहिलें कारण म्हणजे हा श्लोक गीताशास्त्राचा अंतिम श्लोक आहे. या श्लोकांत गीताशास्त्राची समाप्ति झाली आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. यापुढें गीतेच्या पुस्तकांत श्लोक आहेत व गीता या पुस्तकाचा शेवट 'यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः' (गीता १८–७८) या श्लोकांत झालेला आहे. परंतु गीताशास्त्र व गीतेचें पुस्तक यांत फरक आहे. भगवंताला गीताशास्त्रांतून जें प्रमेय सांगावयाचें होतें, तें या श्लोकांत सांगून संपलें आहे. उदाहरणार्थ, जेवावयास पंगत बसण्यापूर्वीं यजमान वाढप्यांना विचारीत असतो कीं, 'सर्व वाढून संपलें कां ? त्यावर वाढपी उत्तर देतात, "हो ! सर्व वाढणें संपलें." ह्याचा अर्थ, 'तूपहि वाढण्यांत आलें.' तद्वतच भगवंताच्या मनांतून अर्जुनाला जें गीताशास्त्र सांगावयाचें होतें, तें येथें संपलें. याच्यापुढें शास्त्राच्या विषयाचें विवेचन नाहीं. याच्या पुढचे 'इदं ते नातपस्काय' (गीता १८–६७) वगैरे श्लोक आहेत, त्यांत भगवंतांनीं अनुबंधचतुष्टयापैकीं अधिकारी, प्रयोजन इत्यादि सांगितलें आहे. परंतु शास्त्रविषय ज्याला म्हणतात,

तो येथेंच संपला. तात्पर्य, गीताशास्त्राचा अंतिम म्हणजे उपसंहारात्मक श्लोक म्हणून या श्लोकास महत्त्व आहे.

अर्जुन कुरुक्षेत्रावर लढण्याकरितां आला होता, परंतु दोन्ह दळांत आपलेच गोत्रज लढण्यास तयार झालेले पाहून तो शोकमोहानें व्याकुळ झाला व त्यामुळें आपल्या स्वधर्मभूत युद्धापासून तो पराङ्मुख होत होता. तेव्हां त्याला शोकमोहांतून निर्मुक्त करून कर्तव्यसन्मुख करण्याकरितां भगवंतांनीं अर्जुनास गीतोपदेश केला, असें श्रीमत् शंकराचार्यांनीं म्हटलें आहे. अर्जुनानेंहि 'हें कुळ पाहून माझ्या ठिकाणीं जो शोक उत्पन्न झाला आहे तो सर्व तुझ्या उपदेशावांचून जाणार नाहीं' असेंच म्हटलें आहे ('हें सकळ कुळ देखोनि । जो शोकु उपजलासे मनीं । तो तुझिया वाक्यावांचुनी । न जाय आणिकें ॥' ज्ञा० २–६४). म्हणून गीताशास्त्राचा उपक्रम 'अशोच्यानन्वशोचस्त्वम्' (गीता० २–११) अशा भगवंताच्या प्रत्यक्ष उपदेशानेंच झाला आहे. तात्पर्य, अर्जुन मोहजन्य शोकामुळें आपल्या कर्तव्याला विसरला होता व भगवंतांनीं गीता सांगून अर्जुनाचा शोकच दूर केला. पाणी वाहतच असतें पण ओणका अथवा काडी आड आल्यामुळें तें वाहावयाचें थांबल्यास ज्याप्रमाणें ती काडी दूर केली जाते, त्याप्रमाणें अर्जुन लढण्याकरितां रणांगणावर आला होता पण त्या कर्माच्या आड आलेली जी मोहजन्य शोकरूप काडी ती भगवंतांनीं त्याला अध्यात्मज्ञान सांगून दूर केली व त्यामुळें त्याचा 'स्वदेहा नाम अर्जुनु । परदेहा नाम स्वजनु । संग्रामा नाम मलिनु । पापाचारु ॥' (ज्ञा० १८–१२७९) हा मोह नष्ट झाला व तो युद्धालाच आलेला असल्यामुळें तो युद्ध करूं लागला. प्रस्तुत श्लोकांतहि भगवंत 'मा शुचः' असाच उपदेश करतात. उपक्रम व उपसंहार यांचें नेहमीं ऐक्य असावें लागतें व या दृष्टीनें प्रस्तुत श्लोक हा गीताशास्त्राचा उपसंहारात्मक ठरतो व म्हणून तो महत्त्वाचा आहे. कोणत्याहि ग्रंथाचें तात्पर्य मीमांसकांनीं

ग्रंथतात्पर्यनिर्णायक जीं उपक्रमोपसंहारादि षड्लिंगें सांगितलीं आहेत तीं लावून काढीत असतात ('उपक्रमोपसंहारावभ्यासोऽपूर्वता फलम् । अर्थवादोपपत्ती च हेतुस्तात्पर्यनिर्णये ॥') व त्यांत 'उपक्रमोपसंहार' ह्या लिंगाला प्राधान्य आहे. गीता ही कोणी कर्मशास्त्र मानतात, कोणी धर्मशास्त्र अथवा नीतिशास्त्र मानतात व श्रीशंकराचार्य आणि ज्ञानेश्वरमहाराज ती अध्यात्मशास्त्र मानतात. तेव्हां गीता हें कोणत्या प्रकारचें शास्त्र आहे हें ठरवितांना प्रस्तुत श्लोक हा उपसंहारात्मक असल्यामुळें त्याचें महत्त्व विशेष गणलें जातें.

या श्लोकास महत्त्व असण्याचें दुसरें कारण असें आहे कीं, हा श्लोक व याच्या मागचा 'मन्मना भव मद्भक्तो' (गीता १८–६५) हा श्लोक म्हणजे भगवंतांनीं स्वतःच काढलेलें गीतेचें सार होय. अलीकडच्या काळांत माणसांना वेळ व फुरसत नसल्यामुळें आपण वक्त्याला त्याच्या बोलण्याचा मतलब म्हणजे सार थोडक्यांत सांगा असें सांगत असतों. गीतेवर आजपर्यंत मोठमोठ्या आचार्यांनीं, संतांनीं व विद्वानांनीं टीका लिहिल्या आहेत व त्यांनीं आपापल्या परीनें गीतेचें सार त्यांत थोडक्यांत सांगितलें आहे. खुद्द श्रीशंकराचार्यांनीं गीताभाष्याच्या प्रारंभीं 'संक्षेपतः प्रवक्ष्यामि' असेंच म्हटलें आहे. परंतु आपल्या दृष्टीनें हे टीकाग्रंथ अल्प आहेत असें म्हणतां येणार नाहीं. मात्र भगवंतांनीं अथवा महामुनि व्यासांनीं या व मागील अशा दोन श्लोकांत आपल्याकरितां गीतेचें सार थोडक्यांत सांगितलें आहे. व्यासांनीं असें म्हणण्याचें कारण, भगवंतांनीं गीता फक्त अर्जुनाला सांगितली व ती फक्त व्यास, संजय व धृतराष्ट्र यांच्याच कानावर पडली. परंतु व्यासांनीं भगवंतांचें अफाट बोलणें केवळ सातशें श्लोकांत आणलें, हे त्यांचे जगतावर मोठेच उपकार झाले आहेत. खुद्द ज्ञानेश्वरमहाराजांनीं व्यासांबद्दल ठिकठिकाणीं धन्योद्गार काढले आहेत. ते म्हणतात, "ज्याप्रमाणें शहाण्या माणसांनीं

पंखा बनवून अफाट वाऱ्याला, वाटेल तेव्हां घेतां यावा असा आपल्या स्वाधीन केला ('कां अफाटा समीरणा। आपैतेपण शाहाणा। केलें जैसा विंजणा। निर्मूनियां॥' ज्ञा० १८–१६९८) त्याप्रमाणें जगावर व्यासांचा हा मोठा उपकार झाला कीं, त्यांनीं श्रीकृष्णांच्या उक्तीला ग्रंथाचा आकार दिला ('म्हणौनि श्रीव्यासाचा हा थोरु। विश्वासि जाला उपकारु। जे श्रीकृष्णउक्ती आकारु। ग्रंथाचा केला॥' ज्ञा० १८–१७०७). तेव्हां ज्याअर्थीं खुद्द ज्ञानेश्वरमहाराज 'तैसा व्यासाचा मागोवा घेतु' (ज्ञा० १८–१७२२) असें म्हणतात, त्याअर्थीं भगवंतांनीं सांगितलेलें गीतेचें सार व्यासांनीं या दोन श्लोकांत आपल्यापुढें आणून ठेवलें आहे, असें आपणांस म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं.

आतां इतर टीकाकारांनीं गीतेच्या काढलेल्या सारास जरी महत्त्व असलें तरी सर्वांत जास्त महत्त्व खुद्द गीताकारांनीं अथवा व्यासांनीं काढलेल्या सारासच आहे. 'मन्मना भव मद्भक्तो' व 'सर्वधर्मान् परित्यज्य' (गीता १८-६५।६६) या श्लोकांच्या पूर्वीचा श्लोक पुढीलप्रमाणें आहे :—

'सर्व गुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः। इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम्॥' (गीता १८-६४) 'तुला मी माझें गुह्यांतील गुह्य असें रहस्य (ज्ञान) पुन्हां सांगतों. कारण तूं माझा अत्यंत आवडता आहेस व म्हणून तुला मी तुझ्या हिताची गोष्ट सांगतों.' पुन्हां म्हणण्याचें कारण गीतेचा अठरावा अध्याय हाच मूळांत गीतेचें सार आहे. ('अठरावा अध्यावो नोहे। हे एकाध्यायी गीताचि आहे।' ज्ञा. १८–८४) त्यांतसुद्धां गीतेचा विषय एका दृष्टीनें 'नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाधिगच्छति' (गीता १८-४९) या श्लोकांत संपला. पुन्हां 'सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म' (गीता १८–५७) या श्लोकापासून मंद अधिकाऱ्यास क्रमानें मुक्ति कशी प्राप्त होते हें सविस्तर सांगितलें आहे. असा प्रसंग मागें आलेला असल्यामुळें भगवंत 'भूयः म्हणजे पुन्हां'

सांगतों, असें म्हणतात. ह्याचा अर्थ भगवंतांनीं या दोन श्लोकांतून ' उपसंहाराचा उपसंहार म्हणजे साराचें सार ' पुन्हां सांगितलें आहे.

कोर्टांत एखादा महत्त्वाचा खटला चालू असला म्हणजे वकील आपल्या अशीलाचा पुरावा सात-आठ दिवस भाषण करून मांडीत असतो. आठ दिवसांनंतर त्यांतील मुद्दे तो थोडक्यांत पुन्हां साररूपानें सांगतो व शेवटीं आपलें भाषण संपण्यापूर्वीं सर्व भाषणाचें सार चार-पांच वाक्यांत आणून माझा अशील निर्दोषी आहे असें सांगत असतो. त्याचप्रमाणें भगवंत ' सर्व गुह्यांतील गुह्य अशी अखेरची एक गोष्ट मी पुन्हां सांगतों, ऐक. ' ( ' सर्व गुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः '। गीता १८–६४ ) असा उपोद्घात करून अर्जुनाला सर्व गीतेचें सार या व मागील अशा दोन श्लोकांत सांगतात. वास्तविक गीताग्रंथ असा आहे कीं, ज्याकरितां प्रत्येकानें वेळ नसला तरी वेळ काढून तो वाचावा. परंतु दुर्दैवानें इतकाहि वेळ मिळत नसला तरी निदान या दोन श्लोकांचा तरी विचार प्रत्येकानें करावा, एवढें या श्लोकांचें महत्त्व आहे. तेव्हां सारभूत अशा या दोन श्लोकांपैकीं प्रस्तुत श्लोक असल्यामुळें त्याचें महत्त्व अनन्यसाधारण आहे.

येथें जातां जातां एक गोष्ट सांगणें अवश्य आहे, व ती ही कीं, भगवंत तीच गोष्ट पुनः पुनः सांगतात, यामुळें गीतेंत ' पुनरुक्ति ' आहे; व ' पुनरुक्ति ' हा सामान्यतः वक्त्याच्या ठिकाणीं एक दोष गणला जातो. परंतु शिक्षकाच्या बाबतींत हा दोष गणला जात नाहीं. शिक्षकानें एकच गोष्ट विद्यार्थ्यांना किती वेळां समजून सांगावी ? तर याचें उत्तर ' एकदां ' नव्हे; तर विद्यार्थ्यास ती चांगली समजेल तितक्या वेळां ती सांगावी. किती वेळां सांगावें लागेल हें विद्यार्थी ज्या अधिकाराचा–म्ह० जसा जड बुद्धीचा–मिळाला असेल त्यावर अवलंबून राहील ! तो जर चवथ्या म्हणजे 'ढ' वर्गातला असला तर एकदां सांगून भागणार नाहीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १७६५०

त्याला तीच गोष्ट पुनः पुनः म्हणजे तीनचार वेळांहि सांगावी लागेल. श्रुति ही श्रोतृहितैषणी ('श्रुतिः श्रोतृहितैषणी') असल्यामुळें श्रुतींत जरी पुनरुक्ति असली तरी तो दोष म्हणून गणला जात नाहीं. विषयाचें काठिण्य व श्रोत्याची ग्रहण करण्याची शक्ति यांवर 'पुनरुक्ति' हा दोष कां गुण, हें अवलंबून रहाणारें आहे. गीता ही नुसत्या अर्जुनाकरितांच नाहीं, तर अर्जुनाला निमित्त करून सर्व लोकांवर अनुग्रह करण्याकरितां भगवान् श्रीकृष्णांनीं ती अर्जुनास सांगितली, असें श्रीशंकराचार्यांनीं व ज्ञानेश्वरमहाराजांनीं या बाबतींत म्हटलें आहे ('सर्वलोकानुग्रहार्थम् अर्जुनं निमित्तीकृत्य भगवान् वासुदेवः अशोच्यान् इत्यादि आह'–(गीताभाष्यः); 'तैसें गीतेचें हें दुभतें । वत्स करूनि पार्थातें । दुभीनलीं जगापुरतें । श्रीकृष्णगाय ॥' (ज्ञा. १८–१६८९). तेव्हां गीता जगाकरितां असल्यामुळें व जगांत सर्व प्रकारचे अधिकारी असल्यानें व शिवाय गीता हा अध्यात्मज्ञानाचा अतएव समजण्यास कठिण असा ग्रंथ असल्यानें त्यांतील विषय ठसण्याकरितां गीतेंत पुनरुक्ति आहे, व म्हणून तो दोष म्हणतां येत नाहीं. सारांश, गीतेच्या एका अठराव्या अध्यायांतच भगवंतांनीं उपसंहाराचा उपसंहार दोनतीन वेळां केला आहे, व अशा उपसंहारांतील हा अंतिम व सारभूत श्लोक आहे व म्हणून त्याला वैशिष्ट्य प्राप्त झालें आहे.

आणखीहि एका दृष्टीनें या श्लोकाचें महत्त्व सांगण्यासारखें आहे. हा श्लोक म्हणजे भगवंतांनीं आतांपर्यंत अर्जुनाला जें कांहीं सांगितलें त्यावर त्यांनीं जणुं काय केलेलें शिक्कामोर्तबच होय, असें म्हटल्यास हरकत नाहीं. अर्जुन हा रणांगणावरून परत चालला होता. वास्तविक तो लढण्याकरितां आला होता. परंतु तो जो परत चालला होता, ह्याचें कारण तो लढाईला भीत होता म्हणून नव्हे. तो अस्सल क्षत्रिय होता. तो मरण्यास किंवा मारावयास भीत नव्हता. तो पापाला भीत होता. तो म्हणतो,—'पापमेवाश्रयेदस्मान्हत्वैतानाततायिनः' (गीता १–३६) व भगवान्

त्याला वारंवार सांगतात कीं, ‘अर्जुना! ऊठ व लढ.’ (‘क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप’–गीता २–३; ‘ततो युद्धाय युज्यस्व’–गीता २–३८; ‘तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व’–गीता ११–३३). हें त्याला पटावें म्हणून अनेक प्रमाणें व युक्त्या भगवंतांनीं आतापर्यंत अर्जुनाला सांगितल्या व शेवटीं त्याच्या मनांत संशयाचें किल्मिषहि राहूं नये म्हणून प्रस्तुत श्लोकांत सांगतात, ‘अर्जुना! लढण्यापासून पाप होणार कां पुण्य होणार हा विचार तूं सोडून दे. तूं पाप आणि पुण्य हें सगळें माझ्यावर सोपीव. तुझ्या पापपुण्याची सर्व जबाबदारी माझ्याकडे लागली. तूं मला शरण ये आणि मी तुला सर्व पापांतून मुक्त करीन’ (‘अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि’). अशी स्वतःवर जबाबदारी घेऊन शिष्याला मोकळा करणारा असा हा प्रसंग आहे. म्हणून या श्लोकाला भक्तिशास्त्रामध्येंहि एक महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे.

उदाहरणार्थ, जसा एखादा हुशार व चौकस रोगी एखाद्या वैद्याकडे जातो. वैद्य त्याला औषध सांगतो. पण हा चौकस रोगी एकदम औषध घेत नाहीं. तो वैद्याला अनेक प्रश्न विचारतो. तो म्हणतो, “वैद्यबुवा! माझ्या स्नेह्यानें मला आपणाकडे आणलें आहे व मला आपलें औषधहि घ्यावयाचें आहे. परंतु तत्पूर्वीं मला आपणास असें विचारावयाचें आहे कीं, आपण स्वतः वैद्यकीचें अध्ययन केलें आहे, कां आपलें नुसतें परंपरागत ज्ञान आहे? आपला अनुभव व व्यवसाय किती वर्षांचा आहे–वगैरे” या प्रश्नांस वैद्याकडून योग्य उत्तरें मिळालीं तरी शेवटीं तो विचारतो, “वैद्यबुवा! आपणांस आणखी एकच प्रश्न विचारतों. आपण जें मला औषध देत आहां, त्यापासून पूर्वीं कोणाला गुण आला आहे का? अथवा या औषधाचा प्रयोग माझ्यावरच प्रथमतः आपण करीत आहांत? तसें असेल तर मी प्रयोगावारीच खलास व्हायचा!” त्यास शांत करता येईल असा वैद्याच्या

भात्यांत एकच बाण असतो. तो वैद्य खंबीर असला तर त्याला म्हणतो, "तुम्ही फार चौकशी करीत बसूं नका! माझ्यावर विश्वास ठेवून तीन दिवस औषध घ्या, व गुण आला तरच पैसे द्या. पण श्रद्धा, विश्वास ठेवून औषध घ्या, एवढेंच मला आपणांस सांगावयाचें आहे." तसेंच भगवंत अर्जुनाला म्हणतात, "अर्जुना, मी तुला सर्व पापांतून मुक्त करीन. तूं फक्त सर्वधर्मपरित्यागपूर्वक मला शरण ये म्हणजे झालें." हें भगवंतांचें अखेरचें निश्चयात्मक सांगणें आतांपर्यंत त्यांनीं जें सांगितलें त्यावर शिक्कामोर्तब करणारें आहे व म्हणून हा श्लोक महत्त्वाचा आहे.

याप्रमाणें या श्लोकाचें महत्त्व विविध प्रकारचें आहे. हें सांगण्यांत मुख्य हेतु असा आहे कीं, वाचकांचें लक्ष या श्लोकाकडे अधिक वेधलें जावें. प्रस्तुत श्लोकाचा अर्थ वरवर पाहिला असतां आपल्याला तो चमत्कारिक असा वाटेल. कारण गीतेचा जो उपक्रम आहे त्याच्याशीं तो विसंगत भासतो. मीमांसक उपक्रम व उपसंहार मिळून एकच लिंग मानतात, ह्याचें कारण या दोहोंच्या अर्थांत नेहमीं साम्य असावें लागतें. परंतु ह्या श्लोकाचा अर्थ गीतेच्या उपक्रमाशीं किती विसंगत आहे ह्याची कल्पना येण्याकरितां मी आपणांस एक दृष्टान्त देतों—'एक जेवण्याची पंगत बसली होती व वाढपी खीर वाढतां वाढतां, एका पानावर ती चुकून न वाढतां, तो तसाच पुढें वाढत गेला. त्या पानावर बसलेला माणूस त्यास म्हणाला, "अरे! ह्या पानावर खीर वाढावयाची राहिली आहे. तूं घाईंत हें पान वगळून बाकी सर्व पानांवर खीर वाढलीस. तरी आतां खीर वाढावयास घेऊन ये." त्यावर तो जर म्हणाला कीं, "मागाहून रायतें वाढावयास येत आहे, तेंच आपण घ्या म्हणजे झालें!" तर त्याचें हें सांगणें अत्यंत चमत्कारिक व अप्रस्तुत होईल. तद्वतच गीतेच्या प्रारंभीं अर्जुनाचा प्रश्न काय आहे? व भगवंत या उपसंहारात्मक श्लोकांत काय सांगत आहेत ह्यांचा जर आपण नीट विचार केला तर

भगवंताचें सांगणें ‘ क्षीर मागे तया रायतेंचि वाढी ’ ( तुका- ३१३२ ) याप्रमाणें अत्यंत चमत्कारिक आहे, असें वाटेल. तेव्हां गीतेचा उपक्रम काय आहे व तसेंच गीतेंत अभ्यास कशाचा सांगितला आहे, ह्याचा आपण प्रथमतः विचार करूं व नंतर प्रस्तुतच्या उपसंहारात्मक श्लोकाकडे वळूं.

अर्जुन जो रणांगणावर आला होता तो सर्व सामदामादि उपाय संपल्यानंतर आला होता. खुद्द विदुर व भगवंत यांनीं केलेली शिष्टाई फलद्रूप झाली नाहीं. यामुळें युद्ध धर्म्य ठरलें व म्हणूनच भगवंतांनीं अर्जुनाला ‘ हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् । तस्मादुत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः ॥ ’ (गीता २-३७) असा उपदेश केला आहे. पूर्वीचें युद्ध म्हणजे अलीकडील गणिती युद्धाप्रमाणें ( Mathematical war ) म्हणजे ‘ अज्ञात दिशेंतून कोठूनतरी बॉंब पडणें ’ अशा प्रकारचें नसे. योद्धे एकमेकांसमोर उभे राहून लढत. कोणाबरोबर आपण लढत आहोंत हें लढणाऱ्यांना दिसत असे. अर्जुन तर योग्य काय व अयोग्य काय हें पाहूनच युद्ध धर्म्य आहे असें निश्चित होऊन मगच लढण्याकरितां रणांगणावर आला होता. एवढेंच नव्हे तर रणांगणावर आल्यानंतरसुद्धां कांहीं काल आपण लढण्याकरितां आलेलों आहोंत ह्याची जाणीव अर्जुनाच्या ठिकाणीं होती व म्हणूनच तो म्हणतो, ‘ या रणसंग्रामामध्यें मला कोणाबरोबर युद्ध करावयाचें आहे. (‘कैर्मया सह योद्धव्यमस्मिन् रणसमुद्यमे । ’ (गीता १-२२) ‘ तें मी पाहून घेईन ’.

परंतु माणसाचें मन हें कांहीं विचित्र आहे. मनानें केलेला निश्चय शेवटास जाईलच असें निश्चित सांगतां येत नाहीं. उदाहरणार्थ, शाळेंतील मुलें परीक्षेच्या अभ्यासासाठीं पहांटे उठण्याकरितां रात्रीं निजण्यापूर्वीं घड्याळाचा गजर लावून निजतात. एऱ्हवीं उशीरां निजतात पण पहाटे उठावयाचें म्हणून त्या दिवशीं लवकर निजतात. ठरलेल्या वेळीं पहांटे गजरहि होतो; तीं जागीं होतात

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्वकमल.



परंतु थोड्या वेळानें उठूं असा विचार करून तीं गजर बंद करतात व अंगावर पांघरूण घेऊन सकाळीं उजाडेपर्यंत निजतात. ह्याचें कारण ज्या परिस्थितींत म्हणजे रात्रीं जेव्हां निश्चय केला त्यावेळची परिस्थिति पहांटे थंडी पडल्यामुळें बदलली. कित्येक चंचल वृत्तीच्या लोकांचें मन तर बसून ऐकत असतांना जें असतें तें उठल्याबरोबर बदलतें. अगोदर 'मी तुमच्याबरोबर येतों' असें म्हणणारा एखादा गृहस्थच उठल्याबरोबर 'बरें, आतां तुम्हीच जा,' असें म्हणतो.

कौरव हे आपले शत्रु आहेत, दायाद आहेत, अशा बुद्धीनें अर्जुन रणांगणावर आला; परंतु तेथें आल्यानंतर त्याला ते सर्व आपले नातेवाईक दिसूं लागले ('तत्रापश्यत्स्थितान्पार्थः पितॄनथ पितामहान् । आचार्यान्मातुलान्भ्रातॄन्पुत्रान्पौत्रान्सखींस्तथा ॥ श्वशुरान्सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि । तान्समीक्ष्य स कौन्तेयः सर्वान्बन्धूनवस्थितान् ॥' गीता १-२६-२७). गीतेंत सुंदर काव्य आहे. व्यासांनीं जी ही यादी दिली आहे ती उगीच नव्हे. त्यांना गीतोपदेश करण्यास काय कारण घडलें म्हणजेच गीतेचें बीज कशांत आहे, तें दाखवावयाचें आहे. अर्जुनाला जें वस्तुतः दिसावयास पाहिजे होतें तें त्यास दिसलें नाहीं, तिसरेंच दिसलें हें सांगण्याकरितांच ही यादी आहे. ज्या यादीची आठवण भाद्रपद महिन्यांतील पितृपंधरवड्यांत व्हावयास पाहिजे होती, ती आठवण अर्जुनाला रणांगणावर झाली यांतच गीतेचें बीज आहे.

ज्ञान बदललें कीं भावना बदलते व भावनेबरोबर क्रिया बदलते. वास्तविक अर्जुन थोर वीर होता. 'तुवां संग्रामीं हरु जिंतिला । निवातकवचांचा ठावो फेडिला । पवाडा तुवां केला । गंधर्वांसी ॥' (ज्ञा. २-१०) असें त्याचें भगवंतांनींच वर्णन केलें आहे. पण, ज्याप्रमाणें भुंगा हा लांकूड पोखरून त्याचा पदरन् पदर काढण्यास समर्थ असतो पण यःकश्चित् कमळांत अडकला जातो ('जैसा भ्रमर भेदी कोडें । भलतैसें काष्ठ कोरडें । परि कळिकेमाजीं सांपडे । कोंवळिये ॥ जेथ उत्तीर्ण होईल प्राणें । परी तें कमळदळ चिरूं

नेणे । तैसें कठिण कोंवळेपणें । स्नेह देखा ॥ ' ज्ञा. १-२०१-०२); त्याचप्रमाणें अर्जुन महाशूर खरा, पण तो कृपेनें आकळला गेला ('कृपया परयाविष्टो विषीदन्निदमब्रवीत् । ' गीता १-२८). ह्याचा परिणाम असा झाला कीं, जें युद्ध धर्म्य होतें तेंच त्याला अधर्म्य वाटूं लागलें व तो लढण्याकरितां आलेला रणांगणांतून परत जाऊं लागला. अर्जुनाची अशी मनाची चलबिचल कां झाली हें सांगणें फार कठिण असल्यामुळें ज्ञानेश्वरमहाराजांनीं तो मायेनें मोहाच्या फेऱ्यांत सांपडला असेंच संजयद्वारां म्हटलें आहे. ('हे आदिपुरुषाची माया । ब्रह्मेयाही नयेचि आया । म्हणवूनि भुलविला ऐके राया । संजयो म्हणे ॥ ' ज्ञा. १-२०३). खुद्द अर्जुनानेंहि कबुली दिली आहे कीं, माझें चित्त मोहानें व्याकुळ झाल्याकारणानें 'माझें लढण्यांत हित आहे, का न लढण्यांत हित आहे' हें मला कळेनासें झालें आहे. ('देवा मज तैसें जाहलें । जें मन हें भ्रांती ग्रासिलें । आतां काय हित आपुलें । तेंही नेणें ॥ ' ज्ञा. २-५७). म्हणून तो भगवंताला म्हणतो, "देवा! लढणें धर्म्य आहे कां न लढणें धर्म्य आहे तें मला स्पष्ट व निःसंनिग्धपणें सांगा. ('कार्पण्यदोषोपहतस्वभावः पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः । यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे । शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥ ' गीता २-७)". नाहींतर व्यवहारांत कांहीं लोक दुटप्पी बोलतात. एका गृहस्थानें आपल्या स्नेह्याला विचारलें, "मी अमक्या गृहस्थाकडे जाऊं का?" स्नेही म्हणाला, "जा." यानें पुन्हा विचारलें, "का नको जाऊं?" तो म्हणाला, "नाहीं गेलास तरी चालेल." आतां यानें जावें, का जाऊं नये! असें उत्तर दिल्यास काय करावें हें माणसाला समजत नाहीं. म्हणून अर्जुन भगवंताला म्हणतो कीं, 'माझें कल्याण कशांत आहे, तें मला निश्चितपणें सांगा'. ('यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे'); मात्र तुमचें सांगणें धर्माला अविरुद्ध असलें पाहिजे. ('तरी उचित काय आम्हां । जें व्यभिचरेना धर्मा । तें झडकरी पुरुषोत्तमा । सांगें आतां ॥ ' ज्ञा. २-६३). तेव्हां अर्जुनाचा

प्रश्न ‘ जें धर्म्य असेल तेंच सांगा ’ असा आहे. त्यावर भगवंतहि अर्जुनास म्हणतात, “ अर्जुना ! धर्मदृष्ट्याहि तुझें रणांगणांतून जाणें योग्य नाहीं. ” ( ‘ स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकंपितुमर्हसि ’ गीता २–३१ ). दया चांगली ही गोष्ट खरी, पण तिचा चांगलेपणा ती कोणाला, कोणत्या वेळीं व कशी करावी यावर फार अवलंबून आहे. गाईचें दूध जरी चांगलें असलें तरी तें विषमज्वरांत ज्याप्रमाणें देतां येत नाहीं, त्याचप्रमाणें दया ही चांगली असली तरी रणांगणांत उतरल्यावर ती उपयोगी नाहीं. ( ‘ अगा गोक्षीर जरी जाहलें । तरी पथ्यासि नाहीं म्हणितलें । ऐसेनिहि विष होय सुदलें । नवज्वरीं देतां ॥ अर्जुना तुझें चित्त । जऱ्ही जाहलें द्रवीभूत । तऱ्ही हें अनुचित । संग्रामसमयीं ॥ ’ ज्ञा. २–१८३-८४ ) ”. किंवा लहान मुलाचें जेवतांना कोडकौतुक करणें योग्य आहे, परंतु तो शाळेंत जाऊं न लागल्यास त्या वेळीं त्याच्यावर दया करणें योग्य ठरणार नाहीं. अशा वेळीं त्याच्या थोबाडींत मारून त्याला शाळेंत घालविणें हेंच योग्य ठरेल. नाहींतर तो घागरगडचा सुभेदार होईल. तेव्हां दया ही युद्धप्रसंगीं योग्य नाहीं, असें भगवंत अर्जुनाला सांगतात. तात्पर्य, गीतेचा उपक्रम अर्जुनानें धर्मविषयक विचारलेल्या प्रश्नानें झालेला आहे व भगवंतांनींहि मोहानें अधर्मप्रवृत्त झालेल्या अर्जुनाला धर्मप्रवृत्त करण्याकरितां गीतोपदेशास प्रारंभ केलेला आहे.

आतां आपण ‘ अभ्यास ’ म्हणून जें लिंग आहे, त्या दृष्टीनें गीतेचा विचार करूं. या दृष्टीनें विचार करूं लागल्यास आपणांस भगवंतांनीं ठिकठिकाणीं स्वधर्माचेंच आचरण करावयास सांगितलें आहे, असें आढळून येईल ( ‘श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् । स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥’ गीता ३–३५; ‘ स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः । ’ गीता १८–४५; ‘ स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः । ’ गीता १८–४६; ‘ तया सर्वात्मका ईश्वरा । स्वकर्मकुसुमांची वीरा । पूजा केली होय

अपारा। तोषालागीं ॥' ज्ञा० १८–९१७). तेव्हां गीतेंत स्वधर्माच्या आचरणाचा अभ्यास ठिकठिकाणीं सांगितला आहे.

शिवाय आणखीहि एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. ती ही कीं, भगवंत आपला अवतार धर्मस्थापनेकरितांच आहे असें म्हणतात (' यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत। अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्। धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥' गीता ४–७-८). तेव्हां धर्माच्या स्थापनेकरितां अवतार घेणारे भगवान् गीतेच्या उपसंहारात्मक श्लोकांत' ' अर्जुना! हे सर्व धर्म सोडून, हे कर्म सोडून, घाल माझ्यापुढें लोटांगण, ये मला शरण व या धर्माच्या कचाट्यांतून हो एकदांचा मोकळा ' असें सांगणें शक्य नाहीं. शिवाय असें सांगणें हें गीतेच्या उपक्रमाशीं अर्थात् अर्जुनाच्या प्रारंभींच्या प्रश्नाशीं व गीतेंत जो स्वधर्माचा अभ्यास सांगितला आहे त्याच्याशीं विसंगत व विरोधी ठरेल.

तसेंच धर्म टाका म्हणून सांगावयास भगवंत कशास पाहिजेत? माणसांची सहजप्रवृत्ति अधर्माकडे असते. कारण मनुष्याचा स्वभाव असा आहे कीं, जें गोड लागेल तिकडे तो स्वभावतःच जातो. त्याच्या जशा वासना, जसे संस्कार तदनुसार मनुष्याची प्रकृति असते. भागवतांतील ' लोके व्यवायामिषमद्यसेवा नित्यास्तु जंतोर्न हि तत्र चोदना। व्यवस्थितिस्तेषु विवाहयज्ञसुराग्रहैरासु निवृत्तिरिष्टा ॥' (ए. भा. ५–११) हा श्लोक प्रसिद्ध आहे. त्यावर श्रीएकनाथ लिहितात—' वेदें न करितां प्रेरणा। विषयांवरी सहज वासना। स्वभावें सकळ जना। सदा जाण सर्वांसी ॥' (ए. भा. ५–२०८). सरकारनें जरी कायदा केला तरी लोक दारू पितातच! " जैसें खालारा धांवें पाणी। भ्रमर फुलाचिये घाणीं। नाना सुटला सांजवणीं। वत्सुचि पां ॥' (ज्ञा० १८–४८१) या न्यायानें मनुष्याची स्वाभाविक प्रवृत्ति जें तात्पुरतें गोड असतें अशा प्रेयाकडे असतें. पोराची प्रवृत्ति सामान्यतः

खेळाकडेच असते व आई त्याला अभ्यास कर असें सांगूं लागली तर पोरगा म्हणतो, 'आई नसलेली बरी.' कोयनेल घेण्यास कडू लागतें. परंतु वस्तुतः तें घेण्यातच माणसाचें हित आहे. तेव्हां प्रेय सांगण्याकरितां शास्त्राची जरुरी नाहीं. आरंभीं कडू पण ज्याच्यांत मनुष्याचें आत्यन्तिक कल्याण असतें, असें जें श्रेय तें सांगण्याकरितांच शास्त्राची जरुरी आहे. 'अंगा मनासि रुचि यावें' (ज्ञा० १३-७७७) म्ह० 'जें शरीरास व मनास आवडेल' तें सांगण्याकरितां गीतेची जरुरी नाहीं. 'गंगेचें पाणी समुद्राला मिळो' असें म्हणून अर्घ्य सोडण्याची जरुरी नाहीं. तें कोठें उलट गंगोत्रीला जात असतें? त्याचा ओघ समुद्राकडेच असतो. म्हणून जें उत्कृष्ट जीवन आहे व जेथें संयमाची जरुरी आहे तें सांगण्याकरितांच शास्त्राची जरुरी आहे. 'मजा करा' हें सांगावयास शास्त्र नको. जें हित अगर अहित यांची जाणीव करून देतें त्यालाच शास्त्र म्हणतात ('शास्ति हिताहितं यत्तच्छास्त्रम्'). गीता हें अध्यात्मशास्त्र आहे व ज्या मोहास्तव अर्जुन स्वधर्माला अधर्म व परधर्माला धर्म समजूं लागला होता व त्यामुळें तो तामस त्याग करीत होता, तो मोह भगवंतांनीं अध्यात्मज्ञान सांगून नष्ट केला व अधर्मप्रवृत्त झालेल्या अर्जुनास धर्मप्रवृत्त केलें. तेव्हां अशा गीताशास्त्राच्या उपसंहारात्मक श्लोकांत भगवंत अर्जुनाला 'दे धर्म टाकून' असें सांगतील हें संभवनीय नाहीं. उलट, ते 'स्वधर्मे निधनं श्रेयः' असेंच सांगतील.

तात्पर्य, गीताग्रंथाचा उपक्रम, त्यांत सांगितलेला अभ्यास, भगवंताच्या अवताराचें प्रयोजन व शास्त्रप्रवृत्ति इत्यादिकांचा विचार केला असतां भगवंत 'सर्व गुह्यतम' मी तुला सांगतों. असें म्हणून जरी अर्जुनाला 'सर्वधर्मान्परित्यज्य' असें सांगतांना दिसत असले तरी त्याचा अर्थ 'सर्व धर्म टाकून दे,' असा असणेंच शक्य नाहीं. म्हणून 'सर्वधर्मान् परित्यज्य' या पदांचा अर्थ करतांना हा श्लोक सांगणारे कोण आहेत, हा कोणाला

उपदेश केला आहे, कोणत्या प्रसंगीं केला आहे, या सर्व गोष्टींचा विचार करावयास पाहिजे. ज्याप्रमाणें आई मुलावर रागावली म्हणजे 'कार्ट्या मर' असें म्हणते, पण त्याचा अर्थ 'जग' असाच आहे. किंवा उलट दृष्टान्त द्यावयाचा झाला तर मोठ्या झालेल्या मुलास 'लालयेत् पंचवर्षाणि दशवर्षाणि ताडयेत्। प्राप्तेषु षोडशे वर्षे पुत्रे मित्रवदाचरेत् ॥' हें तत्त्व जाणणारा बाप म्हणतो, 'आपण फार शहाणे आहांत.' त्याचा अर्थ 'तूं मूर्ख आहेस.' असा आहे. 'तूं शहाणा आहेस असा नव्हे.' तद्वतच 'धर्म टाक.' असा जरी वरवर पाहतां या श्लोकाचा अर्थ दिसत असला तरी उपक्रम व अभ्यास इत्यादिकांचा विचार केला तर तूं 'धर्माचेंच आचरण कर.' असेंच सार असावें असें निघतें व त्यास अनुसरूनच 'सर्वधर्मान् परित्यज्य' या पदांचा अर्थ करावयास पाहिजे. जेथें वाच्यार्थ ग्रहण करण्यानें वक्त्याच्या तात्पर्यार्थाशीं विरोध येत असेल तेथें लक्षणा करावी असा शास्त्राचा नियम आहे.

परंतु कांहीं लोकांनीं केवळ वाच्यार्थाकडे लक्ष देऊन या श्लोकाचे भलभलते अर्थ केले आहेत. उदाहरणार्थ, एका महानुभावाला मीं विचारलें कीं, 'तुम्ही बायकांना सुद्धां संन्यास देतां. याला आधार काय ?' त्यावर त्यानें आधार म्हणून प्रस्तुत श्लोक माझ्यापुढें ठेवला व तो म्हणाला, 'या श्लोकांत भगवंत सर्वांनीं संन्यास घ्यावा असेंच सांगतात.' परंतु हा अर्थ योग्य नाहीं. अर्जुन सर्व सोडून भिक्षाहि मागण्यास तयार झाला होता. ('ते असतु येथवर। भिक्षा मागतां भली ॥' ज्ञा. २–४६ ). संन्यास घेण्यास त्याची तयारीच होती. भगवंतांनीं फक्त एवढेंच म्हणावयाचा अवकाश होता कीं, 'अर्जुना ! फार उत्तम करीत आहेस. जा रानांत आणि बस माझें भजन करीत.' पण भगवंतांनीं असें कांहींहि न म्हणतां उलट 'क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते' (गीता २–३ ) असाच त्याला उपदेश केला आहे. तेव्हां या श्लोकाचा

अर्थ 'सर्व धर्मांचा त्याग करून आश्रम-संन्यास घ्यावा.' असा नाहीं.

या श्लोकाचा अर्थ करतांना गीता हें कोणत्या प्रकारचें शास्त्र आहे हें ध्यानांत ठेवणें आवश्यक आहे. गीता हें अध्यात्मशास्त्र आहे. गीतेच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं जो संकल्प आहे त्यांत 'ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे' असें म्हटलेलें आहे. यांतील योग शब्दाचा अर्थ 'कर्मयोग' असा आहे. गीतेंत मुख्यतः कर्मयोग आहे परंतु तो अध्यात्माच्या पायावर उभारलेला आहे. प्रस्तुत श्लोका-वरील ज्ञानेश्वरमहाराजांनीं जी टीका लिहिली आहे ती वाचली असतां गीता हें अध्यात्मशास्त्र आहे हें आपल्या लक्षांत येईल. ज्ञानेश्वरमहाराज लिहितात—'तैसें धर्माधर्मांचें टवाळ। दावी अज्ञान जें कां मूळ। तें त्यजूनी त्यजीं सकळ। धर्मजात ॥' (ज्ञा. १८-१३९५). अर्जुन भगवंताला विचारतो कीं, 'मला धर्म्य काय आहे तें सांगा.' आणि भगवंत उत्तर देतात, 'धर्माधर्मांचें टवाळ!' तेव्हां अर्जुनाचें विचारणें एक व भगवंताचें उत्तर दुसरेंच असा विरोध आपणांस वरवर विचार केला असतां भासतो. परंतु गीता हें अध्यात्मशास्त्र आहे. या दृष्टीनें आपण जर प्रस्तुत श्लोकाचा व ह्या ओंवीचा विचार केला तर आपणांस हा विरोध नसून केवळ विरोधाभास आहे, हें प्रत्ययास येईल.

अर्जुनाच्या प्रश्नाचें उत्तर देणारे साक्षात् योगयोगेश्वर भगवान् आहेत. त्याची मांडणी करणारे महामुनि व्यास आहेत आणि त्यावर टीका लिहिणारे ज्ञानेश्वर महाराजांसारखे सिद्धप्रज्ञ आहेत कीं, ज्यांचें ज्ञान अप्रतिहत आहे. त्यांचें नांवच मुळीं 'ज्ञानराज' आहे. या सर्वांच्या दृष्टीनें गीता हें अध्यात्मशास्त्र आहे व त्यांत धर्माधर्मांच्या पलीकडे असणारी जी आत्मवस्तु तिचें प्रतिपादन केलें आहे. ('अन्यत्र धर्मादन्यत्राधर्मादन्यत्रास्मात्कृताकृतात्।' कठ. उप. १-२-१४). त्या आत्मवस्तूच्या ठिकाणीं धर्माधर्म नाहींत,

ह्याचें कारण ती आत्मवस्तु व्यापक असल्यामुळें तिच्या ठिकाणीं कोणतीच क्रिया संभवत नाहीं. आकाशाच्या ठिकाणीं देशपरिच्छेद नाहीं, मग ज्या आत्मवस्तूपासून आकाश निर्माण झालें तिच्या ठिकाणीं देशपरिच्छेद कोठून असणार ? ( 'तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः '—तैत्तिरीय उप. २–१ ). ती देश-काल-वस्तु परिच्छेदशून्य अशी निरुपाधिक व्यापक असल्यामुळें तिच्या ठिकाणीं कर्म कोणतेंहि संभवत नाहीं व यामुळें त्या आत्मवस्तूला 'नैष्कर्म्य' असेंहि म्हणतात. ( 'तेथ स्वभावें धनंजया । नाहीं कोणीचि क्रिया । म्हणौनि प्रवादु तया । नैष्कर्म्यु ऐसा ॥' ज्ञा. १८–९७८). ज्याप्रमाणें तळहातावर केस कधींहि उगवत नाहीं, त्याप्रमाणें आत्म्याचे ठिकाणीं कर्मांचा आत्यंतिक अभाव आहे. जेथें कर्मच नाहीं तेथें धर्माधर्म–पापपुण्य हीं कोठून असणार? ('ब्रह्म न लिंपे त्या मेळें । कर्मांअकर्मां वेगळें ॥' तुका. ३४७६ ) ब्रह्मस्थिति–आत्मस्थिति ही पाप-पुण्यातीत आहे. ( 'पापपुण्या नाहीं ठाव । तुका म्हणे सहज भाव ॥' तुका–३७५५ ). या स्थितीप्रत अर्जुनाला नेऊन पोहचविणें हें गीतेचें साध्य आहे.

शिवाय अर्जुनानें भगवंताला नुसता धर्म विचारला नाहीं, तर 'जें निश्चित श्रेय आहे तें मला सांग' अशी त्यानें विनंति केली होती ( 'यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे' गीता २–७ ). 'श्रेय' म्हणजे 'आत्यंतिक कल्याणाची अथवा हिताची गोष्ट.' आतां सर्व प्राणिमात्रांचें आत्यंतिक हिताचें ठिकाण 'श्रेय' जर कोणचें असेल तर तें 'ब्रह्म–आत्मा' होय, कारण त्याची प्राप्ति झाली असतां जीवाच्या मागची कायमची पुनरावृत्ति नष्ट होते ( 'ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन् गता न निवर्तन्ति भूयः ॥' गीता १५–४ ) व या ब्रह्मालाच दुसरें नांव मोक्ष असें आहे ( 'यया ब्रह्मत्वासींचि पार्था । सायुज्य ऐसी व्यवस्था । याची नांवें चौथा । पुरुषार्थु गा ॥' ज्ञा. १४–४०१ ). तेव्हां गीतेंत जरी धर्मांची चर्चा केलेली असली, तरी नुसत्या धर्मांची चर्चा करून गीता

थांबत नाहीं; तर ती निःश्रेयसाची म्हणजे मोक्षाची चर्चा करते. कारण ती केवळ अर्जुनास युद्धप्रवृत्त करण्यासाठीं सांगितली नसून ती त्यास अध्यात्मज्ञान सांगून मोक्षमार्गांत प्रवृत्त करण्यासाठींहि सांगितली आहे. म्हणून गीतेंत प्रत्येक अध्यायांत 'परां शांतिं' (गीता ४–३९) 'शाश्वतं स्थानं प्राप्स्यसि' (गीता १८–६२) अशासारखीं वचनें आलेलीं आहेत ('तस्यास्य गीताशास्त्रस्य संक्षेपतः प्रयोजनं परं निःश्रेयसम्'–शांकरभाष्य). भगवंतांनीं अर्जुनाला समाधि देऊन (म्ह० आत्मजागृतीवर आणून) त्याला युद्धांत घातलें ('अर्जुना देऊनि समाधि। सर्वेंचि घातिला महायुद्धीं। परि तो कृष्ण कृपानिधि। ताटस्थ्य त्रिशुद्धी नेदीचि स्पर्शों ॥') व अर्जुनाचे शेवटचे उद्गार, 'नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा' व 'करिष्ये वचनं तव' असेच आहेत (गीता १८–७३). तेव्हां गीतेंत जरी कर्म सांगितलेलें असलें तरी ज्या ठिकाणीं कर्माची धांव थांबते ('जें धांवतया कर्माची लाणी। नैष्कर्म्यबोधाची खाणी॥' ज्ञा. ४–१६१) अशा नैष्कर्म्य स्थितीप्रत म्हणजेच आत्मस्वरूप स्थितीवर अर्जुनाला आणावयाचें असल्यामुळें भगवंत प्रस्तुत गीताशास्त्राच्या उपसंहारात्मक श्लोकांत अर्जुनाला 'सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज' (गीता १८–६६) असें सांगतात. कारण ब्रह्मप्राप्तीच्या दृष्टीनें जसा 'अधर्म' घातक आहे तसा 'धर्मंहि' घातक आहे. कारण धर्मानें स्वर्गादि उत्तम लोकांची प्राप्ति होईल पण ब्रह्माची प्राप्ति होणार नाहीं ('स्वर्गा पुण्यात्मकें पापें येईजे। पापात्मकें पापें नरका जाइजे। मग मातें जेणें पाविजे। तें शुद्ध पुण्य॥' ज्ञा. ९–३१६). आतां 'सर्व धर्मांचा परित्याग कर' ह्याचा अर्थ 'हे धर्म सोडून, हे कर्म सोडून' असा नाहीं. उलट ज्याला आपली मुक्तता हवी असेल त्यानें अवश्य कर्म करावें असा भगवंताचा आग्रह आहे. ('म्हणोनि फळीं लागु। सांडोनी देहसंगु। कर्में करावीं हा चांगु। निरोपु माझा॥ जो जीव बंधें शिणला। सुटके जाचे आपुला। तेणें पुढतपुढतीं या बोला। आन न कीजे॥' ज्ञा.१८–१७६,७७).

तेव्हां ‘ सर्वधर्मान् परित्यज्य ’ ह्याचा ‘ कर्म कर ’ पण तें अशा युक्तीनें कर कीं तें कर्म अंगाला लागणार नाहीं म्हणजे बाधक होणार नाहीं. ती युक्ति भगवंत प्रस्तुत श्लोकांत सांगतात.

संस्कृतांत ‘ धर्म ’ या शब्दाचे वेगवेगळे अर्थ आहेत. सामान्यतः ‘ धर्म ’ या शब्दाचा अर्थ ‘ ज्यापासून समाजाची धारणा होते, तो धर्म ’ ( ‘ धारणाद्धर्ममित्याहुः धर्मेण विधृताः प्रजाः ’— महाभारत ) असा केला जातो. परंतु ज्ञानेश्वर महाराजांच्या मतें या अर्थानें हा शब्द येथें वापरलेला नाहीं तसेंच धर्म शब्दाचा दुसरा अर्थ ‘ कर्तव्यकर्म ’ असा होतो. तोहि येथें अभिप्रेत नाहीं. येथें ‘ धर्म ’ या शब्दाचा अर्थ कर्मापासून उत्पन्न होणारें जें अदृश्य धर्माधर्मारूप अथवा पापपुण्यरूप फल तें आहे. यासच शास्त्रीय परिभाषेत ‘ अदृष्ट ’ अथवा ‘ अपूर्व ’ असें म्हटलें जातें. आपण जें कर्म करतों त्यापासून दृश्य व अदृश्य अशीं दोन फलें निर्माण होतात. उदाहरणार्थ, आपण नोकरीचें कर्म योग्य केलें तर त्यामुळें पगार मिळतो व नीट केलें नाहीं तर आपला पगार कापला जातो. परंतु त्या कर्माबरोबर आपल्या मनावर एक प्रकारचे बरेवाईट संस्कार उत्पन्न होत असतात. एखाद्याच्या श्रीमुखांत दिली तर तात्पुरतें तें कर्म संपलें असें दिसतें; परंतु, त्यापासून दोघांच्या मनांत वैर उत्पन्न होतें व तोंडांत दिलेला माणूस पुढें फिर्याद लावून श्रीमुखांत देणाऱ्या माणसास दंड अथवा शिक्षा भोगावयास लावतो. मयासुरानें मायागृह निर्माण केलें आणि त्या ठिकाणीं दुर्योधन फरशीच्या ठिकाणीं पाणी समजून धोतर सांवरून चालला असतां वर बसलेली द्रौपदी हंसली व ही गोष्ट दुर्योधनाच्या मनास लागली. अनेक कारणांपैकीं हेंहि एक कारण भारतीय युद्धास कारणीभूत झालें. तात्पर्य, कर्माचे परिणाम फार दूरवर अथवा खोल जात असतात, व हे कर्माचे संस्कारच जन्ममरणाला कारणीभूत होत असतात. अनुकूल व प्रतिकूल ज्ञानावर क्रिया अवलंबून असते; व ती क्रिया शास्त्राच्या मार्गांत पडली तर पुण्य अथवा

१८८५७

धर्म उत्पन्न होतो व शास्त्रविरुद्ध मार्गांत पडली तर पाप अथवा अधर्म उत्पन्न होतो. अशाप्रकारें आपल्या कर्मांपासून उत्पन्न होणारें 'पापपुण्य' अथवा 'धर्माधर्म' हे संस्कार, वासना इत्यादि रूपांनीं शिल्लक राहतात व अशा या धर्माधर्मरूप अदृष्टाचें फल भोगण्याकरितांच जीवाला वारंवार जन्म घ्यावा लागतो. ('क्रिया शरीरोद्भवहेतुरादृता । प्रियाप्रियौ तौ भवतः सुरागिणः । धर्मेतरौ तत्र पुनः शरीरकं । पुनः क्रिया चक्रवदीर्यते भवः ॥'– रामगीता ८) गीता हें मोक्षप्राप्तीचें शास्त्र असल्यामुळें कर्मापासून उत्पन्न होणारे धर्माधर्म टाळण्याकरितां युक्तीनें कर्म कसें करावें हें गीतेंत सांगितलें आहे.

शरीर आहे तोंपर्यंत संघाताकडून कर्म होतच राहणार ('जंव प्रकृतीचें अधिष्ठान । तंव सांडी मांडी हें अज्ञान । जे चेष्टा ते गुणाधीन । आपैसी असे ॥' ज्ञा० ३–५३). आपल्या हातांत फक्त कोणतें कर्म करावयाचें व कोणतें कर्म न करावयाचें एवढेंच आहे. एवढ्या बाबतींतच कर्ता स्वतंत्र आहे. फिरावयास जावयाचें कां देवाला जावयाचें, धार्मिक पुस्तकें वाचावयाचीं कीं पांचट कादंबऱ्या वाचावयाच्या, एवढेंच आपल्या हातांत आहे. त्याचप्रमाणें कर्मांत यश अथवा अपयश येणें हें आपल्या हातांत नाहीं. ज्ञानी पुरुष जरी झाला तरी त्याचें शरीर आहे तोंपर्यंत कर्म घडतच राहतें; कारण शरीराचें उपादान कारण कर्म आहे व उपादान कारणाचा त्याग, कार्य करूं शकत नाहीं. म्हणूनच भगवंत म्हणतात कीं, कोणीहि कर्माचा त्याग क्षणभरसुद्धां करूं शकत नाहीं ('न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ।' गीता ३–५). कुकर्म करून अधोगतीस जाणें हें योग्य नाहीं व आपलें कर्म टाकणें हेंहि योग्य नाहीं. योग्य कर्म करीत आहे परंतु कर्मानें लिप्त होत नाहीं यांतच मनुष्याचें श्रेष्ठत्व व खरें हित आहे. ज्ञानी पुरुषाकडून योग्य व्यवहार म्हणजे कर्म घडत नाहीं, हें म्हणणें योग्य नाहीं. उलट, ब्रह्मज्ञानी उत्कृष्ट कर्म करतो. नाहींतर ज्ञान

हा एक प्रकारचा रोग ठरेल. ज्ञाता हा कसा असतो व कसें कर्म करतो, याचें उत्कृष्ट वर्णन गीतेंत ठिकठिकाणीं आलेलें आहे. ज्या आत्मस्वरूपस्थितींत धर्माधर्म मूळासह म्ह० अज्ञानासह नष्ट होतात, त्या आत्मस्वरूपस्थितीवर तो आरूढ झालेला असतो.

सारांश, 'सर्वधर्मान् परित्यज्य' ह्याचा अर्थ 'कर्म टाक' असा नव्हे, तर 'कर्म असें कर कीं, जें उत्तरजन्माला कारणीभूत होणार नाहीं.' कारणाच्या त्यागांत कार्याचा त्याग होत असतो. धर्माधर्माला कारण आहे देहाहंकार व देहाहंकाराला कारण आहे अज्ञान ('अज्ञानमेवास्यहि मूलकारणम्।' रामगीता). जेथें अहंता नाहीं तेथें नीतिशास्त्रहि लंगडें पडतें. कायद्यांतहि दोषार्ह अज्ञान ('culpable ignorance') व अदोषार्ह अज्ञान ('Non-culpable ignorance') असे दोन भेद केले जातात. जो अहंता व फलास्वाद घेऊन कर्म करतो तोच त्यानें बांधला जातो. कारण त्याची त्या कर्माच्या ठिकाणीं आसक्ति असते. तेव्हां कर्मांत मुख्य बाधक अहंकार आहे व त्याचें समूळ उच्चाटण होण्याकरितां तत्कारणीभूत जें स्वस्वरूपाचें अज्ञान तें नष्ट व्हावें लागतें. तेव्हां अशा अज्ञानाचा त्याग करून तूं मोकळा हो, असें भगवंताला प्रस्तुत श्लोकांत अर्जुनाला सांगावयाचें आहे. हा भगवंताचा हेतु लक्षांत घेऊन ज्ञानेश्वरमहाराजांनीं या श्लोकाचें व्याख्यान केलें आहे. ते म्हणतात, 'सर्वधर्मान् परित्यज्य' म्हणजे 'स्वर्गनरकाला देणारे जे धर्माधर्म, त्या धर्माधर्मास प्रसवणारें जें अज्ञान, त्या अज्ञानाचा तूं त्याग कर' (तैसें स्वर्गनरकसूचक। अज्ञान व्यालें धर्मादिक। तें सांडूनि घाली अशेख। ज्ञानें येणें।' ज्ञा० १८–१३९१). कारण अशा अज्ञानाच्या त्यागानें धर्ममात्रांचा त्याग आपोआप होतो.

अज्ञान हें धर्माला प्रसवत असतें. कारणाच्या त्यागांत कार्याचा त्याग होत असतो, हें पटवून देण्याकरितां ज्ञानेश्वरमहाराजांनीं या श्लोकावरील आपल्या टीकेंत अनेक दृष्टांत दिले आहेत. ज्ञानेश्वर-

महाराज कधीं दृष्टांत अगोदर देतात व मग द्राष्टान्त सांगतात व क्वचित् प्रसंगीं द्राष्टांत अगोदर देऊन मग दृष्टांत सांगतात. प्रस्तुत टीकेंत त्यांनीं दृष्टातांनीं प्रारंभ केलेला आहे, तो असा— 'आशा जैसी दुःखातें । व्याली निंदा दुरितें । हें असो जैसें दैन्यातें । दुर्भगत्व ॥ तैसें सर्गनरक सूचक । अज्ञान व्यालें धर्मादिक ।' (ज्ञा. १८–१३९०-९१). त्यांतील पहिला दृष्टांत, 'आशा जैसी दुःखातें व्याली' म्ह० 'आशा ही जशी दुःखाला प्रसवते, कारणीभूत होते' असा आहे.

आशा ही सर्व दुःखाला कारण आहे ('आशा हि परमं दुःखं नैराश्यं परमं सुखम् ॥' ए. भा. ८–४४). जेथें आशा नाहीं तेथें आनंद असतो. नैराश्य पुरुषाचा आनंद कसा असतो ह्याची कल्पना आशावानाला येणार नाहीं. जो मुलावर आशा ठेवतो तोच—'एवढा लहानाचा मोठा मुलगा केला, इंग्लंडला पाठविला पण तो आतां मला विचारीत नाहीं.'—असें म्हणत रडत बसतो. ज्याचें नातेंवाईक माणूस मरतें तोच ओरडतो. एकदां एके ठिकाणीं एका बाईचें प्रेत उचलण्याची तयारी चाललेली होती. एक विक्षिप्त गृहस्थ जवळून चालला होता. त्याला तेथें एक चमत्कारिक दृश्य दिसलें. प्रेताच्या सभोंवार माणसें रडत होतीं, परंतु सगळीं सारखीं रडत नव्हतीं. कांहीं माणसें मोठ्यानें रडत होतीं तर कांहींच्या रडण्याला भरती-ओहोटी होती. त्यांच्या पलीकडेच एक मनुष्य हातांत तंबाखू घेऊन चोळीत बसला होता व तो मुळींच रडत नव्हता. हें पाहून त्या गृहस्थाला वाटलें कीं, सर्वांनीं रडावें तर सारखेंच रडावें. त्यानें एकाला विचारलें, "आपण कां रडतां?" तो म्हणाला, 'ही माझी आत्या होती;" दुसरा म्हणाला, "ही माझी बहीण होती", तिसरा म्हणाला, "ही माझी बायको होती." नंतर त्यानें त्या तंबाखू चोळणाऱ्या गृहस्थाला विचारलें, "आपण कां रडत नाहीं?" तो म्हणाला, "ही माझी कोणीच नाहीं. मी सहज या बाजूनें चाललों होतों, तों येथें जमलेल्या कांहीं

लोकांपैकीं एकानें मला उचलावयास माणसें कमी आहेत म्हणून बोलावलें व मी येथें आलों. परंतु स्मशान फार दूर आहे, तेव्हां एकदां तंबाखूचा बार मारावा व मग तयारीला लागावें असा मीं विचार केला व म्हणून तंबाखू चोळीत बसलों आहे." तात्पर्य, रडतो कोण, तर ज्यांनीं मेलेल्या माणसांवर आशांचा डोलारा उभा केलेला असतो अशीं माणसें त्या सर्व आशा कोलमडल्या म्हणूनच रडतात. ह्याच्या उलट इतर आजूबाजूचे लोक प्रेत पाहावयास गोळा होतात. ते रडत नाहींत. सारांश, दुःखाला कारण आशा आहे. यास्तव गीता सांगते कीं, माणसानें सत्कर्म अवश्य करावें पण तें फलाशा सोडून करावें. मग त्याच्या वांट्याला आनंद ठेवलेला आहे. माणसें फलाशेनें कर्म करतात व मग रडत बसतात. जो ईश्वरार्पण भावानें कर्म करतो त्याला रडण्याचा प्रसंग येत नाहीं. सारांश, दुःख नको असेल तर आशेचा त्याग करणें अवश्य आहे.

दुसरा दृष्टान्त 'निंदा (जैसी) दुरितातें व्याली' म्ह० 'निंदा जशी पापाला प्रसवते' असा आहे. या ठिकाणीं 'व्याली' हें क्रियापद 'देहलीदीपन्यायानें' दोहोंकडे–दुःखाकडे व दुरिताकडे–घ्यावयाचें. दोषाचें आविष्करण मनुष्याच्या तोंडावर करणें ही निंदा होत नाहीं. बोलावयाचें झालें तर तें माणसाच्या समोर बोलावें, पाठीमागें बोलणें हें निंदेंत गणलें जातें. 'पण तुझें चुकत आहे, असें वागणें वाईट आहे' इत्यादि तोंडावर सांगण्याकरितां धैर्य लागत असतें. तें फार थोड्या लोकांत असतें. इंग्रजींत ज्याला 'Backbiting' म्हणतात म्हणजे 'पश्चात् टवाळी करणें' याला निंदा म्हणतात. याची कल्पना येण्याकरितां नेहमीं आढळून येणाऱ्या एका प्रसंगाचा दृष्टान्त देण्यासारखा आहे तो असा— 'सामान्यत: गांवांतील रावसाहेबांची म्ह० मामलेदारांची बदली झाली कीं मग गांवांतील शिष्ट व व्यापारी लोक त्यांचा सत्कार म्हणून त्यांना मेजवानी देतात. त्या प्रसंगीं तो जरी वाईट

अम्मलदार असला तरी कदाचित् तो पुन्हां आपल्या गांवीं बदलून येईल या बुद्धीनें लोक त्याची त्याच्या तोंडावर स्तुति करतात. ते म्हणतात, "रावसाहेब म्हणजे फार थोर गृहस्थ. भाग्य आपलें कीं, ते आपल्याला ऑफिसर म्हणून इतके दिवस लाभले. नाहींतर लोकांनीं अर्ज केले होते." शब्द सोडलेल्या वाक्याप्रमाणें याचा अर्थ असतो. त्यामध्यें आपण जे शब्द भराल त्यावर त्या वाक्याचा अर्थ अवलंबून असतो. मग रावसाहेब जेवून घराबाहेर पडतात न पडतात तोंच हेच लोक म्हणतात कीं, "आपल्या गांवांतून पाप गेलें. लोकांनीं अर्ज केले होते, परंतु यांची बदली होण्याकरितां. बरें झालें. एकदांची पिडा गेली." याप्रमाणें पश्चात् दोषासंबंधीं बोलणें ही निंदा होय. अशी निंदा करण्यांत पाप होतें. म्हणून पातक नको असें वाटत असेल तर निंदेचा त्याग करणें अवश्य आहे.

तिसरा दृष्टान्त, 'दैन्यातें दुर्भगत्व (व्यालें)' म्हणजे दुर्भाग्य हीन स्थितीला कारणीभूत होतें, असा आहे. नाहींतर दैन्य, दुःख, दारिद्र्य नसावें याकरितां सर्व प्रयत्न करीत असतात. परंतु त्यांची इच्छा नसतांना हीन प्रारब्धामुळें त्यांना ह्या सर्व गोष्टी भोगाव्या लागतात. प्रारब्ध अनुकूल असेल तर न शिकलेल्या माणसालाहि लोक विचारतात, पण तेंच प्रतिकूल असेल तर उत्तम विद्वानालाहि कोणी विचारीत नाहीं. खरोखर पैसा मिळण्यासहि नशीबच कारणीभूत होतें. ('प्रारब्धेंचि जोडे धन । प्रारब्धेंचि वाढे मान ॥' तुका–३४२५). कांहीं माणसांचें ज्ञान फार नसतें, परंतु ते चांगले श्रीमंत होतात. चुलते–पुतणे यांचा छत्तीसाचा आंकडा असतो. मृत्युपत्र करण्याचा प्रसंग जर आला असतां तर पुतण्याला छदामहि मिळण्याचा संभव नव्हता. अशा स्थितींत चुलता जर एकाएकीं कॉलऱ्यानें वारला तर तोच पुतण्या इस्टेटीचा वारस ठरून श्रीमंत होतो. कै. सयाजीराव गायकवाडांना बडोद्याची गादी मिळण्यास त्यांचें भाग्यच कारणीभूत झालें.

एऱ्हवीं त्यांनीं या जन्मांत काय श्रम केले होते कीं, त्यांना गादी मिळावी ! मातीचा धंदा करून घरें बांधलेले लोक आहेत. ह्याच्या उलट जवाहिऱ्याचा धंदा करून शेवटीं दरिद्र अवस्थेला प्राप्त झालेले लोक दिसतात. तात्पर्य, व्यवसाय केवळ निमित्त असून फल देणारें संचितच ठरतें. तुकोबा म्हणतात, 'व्यवसाय निमित्त। फळ देतसे संचित ॥' ( २६१४ ).

आणखी एकदोन घडलेलीं उदाहरणें सांगण्यासारखीं आहेत. माझे एक स्नेही होते. त्यांनीं प्रथमतः जरीचा व्यापार केला. पुढें मंदी आल्यामुळें त्यांचे सर्व पैसे गेले. लोक म्हणूं लागले कीं, "हा काय मूर्ख गृहस्थ ! लढाई संपल्यानंतर मंदीचे दिवस येणार हें माहीत असतांनाहि हा व्यापारच करीत राहिला." पुढें त्यानें जपानशीं व्यापार केला व त्यावर तो चांगला गबर झाला. तेव्हां लोक त्याची पुन्हां स्तुति करूं लागले. यामुळें तो नेहमीं म्हणे कीं, 'मी कधीं मूर्ख होतों व कधीं शहाणा होतों.'

होळकराच्या घराण्यांत एक उदार पण थोडे तऱ्हेवाईक गृहस्थ होत. त्यांच्यासबंधीं अशी एक गोष्ट सांगण्यांत येते कीं, त्यांच्याकडे एक कोंकणांतील भिक्षुक आपल्या मुलाच्या मुंजीकरितां मदत मागावयास गेला. त्यांनीं आपल्या नोकराकडून तांदुळाच्या तीन राशी करविल्या व प्रत्येकींत अनुक्रमें पांचशें, पन्नास व पांच रुपये ठेवले, व त्या भिक्षुकास त्यांतील कोणतीहि एक रास उचलण्यास सांगितलें. परंतु हा भिक्षुक जन्मदरिद्री असल्यामुळें त्यांनीं ज्या राशींत हात घातला तिच्यांत फक्त त्याला पांच रुपयेच मिळाले. कोंकणांतून भाडेंखर्च करून इंदुरला गेला असल्यामुळें पांच रुपये पाहून त्याचें तोंड उतरलें व तो म्हणाला, "महाराज ! मी जितकें भाडें खर्च केलें तितकें तरी आपणांकडून पैसे मिळावे अशी माझी इच्छा आहे." त्यावर महाराज म्हणाले, "तूं कमनशिबी आहेस. बघ, पलीकडच्या राशींत पांचशें रुपये आहेत. ती तूं कां घेतली नाहींस? यावरून तुझें नशीबच फुटकें दिसतें." तात्पर्य, दैन्याला अथवा

श्रीमंतीला प्रयत्न हा कारणीभूत नसून नशीबच खरें फलदायी ठरतें. (' कां अदृष्ट जालिया उदासु । पालटे श्रीमंताचा विलासु । ज्ञा. १८–४९६ ). एवंच, ज्याप्रमाणें आशेच्या त्यागात् दुःखाचा, निंदा न करण्यांत पापाचा, व दुर्भाग्य नष्ट होण्यांत दैन्याचा, नायनाट होतो; त्याचप्रमाणें अज्ञानाच्या त्यागांत धर्माधर्मांचा म्हणजेच पापपुण्याचा व तद्द्वारां जन्ममरणरूप बंधाचा नाश होतो असें भगवंत प्रस्तुत श्लोकांत सांगतात. तेव्हां 'सर्वधर्मान् परित्यज्य' ह्याचा अर्थ अज्ञानविरोधी जें आत्मज्ञान त्यानें संपन्न होऊन धर्माधर्मांचा कायमचा त्याग करणें असा आहे. ह्याचा अर्थ कर्म टाकणें असा नव्हे; तर देहादि संघाताकडून कर्म होत असतांना तें ' मी करतों ' अशा प्रकारचा जो अहंकार त्याचा सकारण, म्हणजे मूळ अज्ञानासह, त्याग करणें असा आहे. हा त्याग आत्मज्ञान-प्राप्तीनें होतो व मग जीव हा कर्मबंधापासून म्हणजे जन्ममृत्यू-पासून मुक्त होतो. हीच गोष्ट ज्ञानेश्वरमहाराज दृष्टांत देऊन सांगतात—' ज्याप्रमाणें दिवस मावळल्यावर मृगजळ नाहींसें होतें किंवा लांकडाच्या त्यागानें अग्नि टाकला जातो, त्याप्रमाणें मिथ्या धर्माधर्माला दाखविणारें जें मूळ अज्ञान, त्या अज्ञानाचा त्याग करण्यांत धर्ममात्रांचा त्याग होतो '. (' अगा दिवसा पाठीं देऊनी । मृगजळ धापे त्यजुनी । कां काष्ठत्यागें वन्ही । त्यजिजे जैसा ॥ तैसें धर्माधर्मांचें टवाळ । दावी अज्ञान जें कां मूळ । ते त्यजूनी त्यजीं सकळ । धर्मजात ॥ ' ज्ञा. १८–१३९४-९५ ).

भगवंत या श्लोकांत ' सर्व धर्मांचा परित्याग कर ' असें सांगतात व त्याबरोबरच ' माम् एकं शरणं व्रज ' म्ह० ' तूं मला एकट्यालाच शरण ये ' असेंहि सांगतात. आतां ' शरण जाणें ' हाहि एक प्रकारचा धर्मच आहे. तेव्हां या श्लोकांत सांगितलेली शरणागति ही आपण ज्याला शरणागति म्हणतों त्याहून भिन्न व ' सर्वधर्मान परित्यज्य ' याच्याशीं जुळणारी पाहिजे. ज्ञानेश्वर-महाराजांनीं या शरणागतीचें स्वरूप आपल्या टीकेंत पुढीलप्रमाणें

सांगितलें आहे. भगवंत म्हणतात, 'अज्ञान नाहींसें झाल्यावर सहजच जो मी एकच उरलों त्या माझ्याशीं अभिन्न होऊन राहणें हीच शरणागति होय' ('मग अज्ञान निमालिया। मीचि येकु असें अपैसया। सनिद्र स्वप्न गेलया। आपणपें जैसें॥ तैसा मी एकवांचूनि कांहीं। मग भिन्नाभिन्न आन नाहीं। सोऽहंबोधें तयाच्या ठायीं। अनन्यु होय॥' ज्ञा. १८–१३९६,९७) आपणासकट सर्व परमात्मच आहे अशा अन्वय बोधांत रंगून राहणें अशी जी 'आत्मरति' तिलाच या ठिकाणीं 'शरणागति' म्हटलें आहे. अशा शरणागतीला वस्तुतंत्र शरणागति म्हणतात.

सामान्यतः लोकांची समजूत भगवंताला शरणागति करणें म्हणजे भगवंताच्या समोर साष्टांग नमस्कार घालणें, अशी असते. याला 'कर्तृतंत्र' अथवा 'क्रियेच्या अंगानें होणारी शरणागति, म्हणतात. अशी शरीरानें होणारी शरणागति सदा अपूर्णच राहणार. कारण यथासांग कर्म घडणें ही फार कठिण गोष्ट आहे. समर्थ म्हणतात, 'यथासांग तें कर्म कांहीं घडेना.' मनुष्य देवाच्या समोर हात जोडून उभा राहतो व तोंडानें 'अन्यथा शरणं नास्ति' हा श्लोक संपूर्ण म्हणेतोंपर्यंत सुद्धां त्याचें मन देवाच्या ठिकाणीं स्थिर राहात नाहीं. 'अन्यथा शरणं नास्ति' एवढा भाग म्हणतो न म्हणतो, तोंच डोक्यांत विचार येतो कीं बाहेर ठेवलेला जोडा ठिकाणावर आहे किंवा नाहीं. मग लगेंच त्याचें लक्ष आपल्या जोड्याकडे जातें व या अनुसंधानांत 'त्वमेव शरणं मम' अथवा 'रक्ष रक्ष परमेश्वर' इत्यादि श्लोकाचा भाग जोड्यासमोरच म्हटला जातो. देवासमोर लोटांगण घालणें अथवा त्याच्यासमोर हात जोडणें ही कायिक शरणागति आहे व ती माणसानें अवश्य करावी. भगवंताची मूर्ति अगर प्रतिमा दिसली तर लोटांगण अवश्य घालावें असें ज्ञानेश्वरमहाराज सांगतात—'लिंग का प्रतिमा दिठीं। देखतखेंवों अंगेष्टी। लोटिजे कां काठी। पडली जैसी॥' (ज्ञा. १७–२०४) तुकाराममहाराजहि 'घालीन लोटांगण महाद्वारीं'

(तुका. १५९३) असेंच म्हणतात. परंतु अशा या क्रियेच्या अंगानें होणाऱ्या शरणागतीचा अंतर्भाव 'कायिक तपांत' केला जातो. शिवाय ह्याच्या पलीकडील असणारें 'वाचिक व मानसिक तप' हें शिल्लक राहतेंच. शिवाय नुसत्या तपानें अथवा कर्तृतंत्र शरणागतीनें 'मा शुचः' हें फल प्राप्त होणार नाहीं. तपाचें फल केवळ 'अंतःकरणशुद्धि' एवढेंच आहे ('यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥' गीता १८–५). 'मा शुचः' हें फल प्राप्त होण्याकरितां 'वस्तुतंत्र' शरणागतीच लागते.

'मा शुचः' हें फल कोणत्या शरणागतीनें प्राप्त होतें या-संबंधींचा विचार गीतेंत अनेक ठिकाणीं आला आहे. भगवंत अर्जुनाला म्हणतात कीं, अर्जुना, आपणासकट परमात्माच सर्व रूपानें नटलेला आहे, असा तुला एकत्वाचा अनुभव आला म्हणजे शोक व मोह यांना अवसरच सांपडणार नाहीं ('अर्जुना ऐसा जाणावा । हा सकळात्मकु देखावा । मग सहजें शोकु आघवा । हरेल तुझा ॥' ज्ञा. २–१५१). उपनिषदांतहि असेंच म्हटलें आहे—'तस्य कः शोकः को मोहः एकत्वमनुपश्यतः' (ईशावास्य.). तसेंच तेथें पापाला व पुण्यालाहि जागा रहात नाहीं. तात्पर्य, आपणासकट सर्व परमात्मा मीच आहे अशा दृढ अपरोक्षज्ञानावर प्राप्त होणें व अशा अद्वैत अनुभवांत स्थिर होणें यालाच पराभक्ति अथवा वस्तुतंत्र शरणागति म्हणतात. ही ज्ञानाच्या अंगानें होणारी शरणागति आहे ('पैं आपुलेनि भेदेंविण । माझें जाणिजे जें एकपण । तयाचि नांव शरण । मज येणें गा ॥' ज्ञा. १८–१३९८). 'सर्वत्र सच्चिदानंद' आहे असें अनुभवास येणें, ह्याचाच अर्थ, परमात्म-वस्तूशीं ज्ञानाच्या अंगानें समरस होऊन जाणें असा आहे व अशाच वस्तुतंत्र शरणागतीनें जीव हा जन्ममृत्यूच्या अतीत होतो ('म्हणौनि जन्मक्षयां- । अतीत ते धनंजया । मी जाले ज्ञाना यया । अनुसरोनी ॥' ज्ञा. १४–५९). शरण ज्याला जावयाचें त्याचें

यथार्थ स्वरूप प्रथमतः कळावें लागतें व तो परमात्मा मी आहे, असा एकत्वाचा अनुभवहि यावा लागतो. हा अनुभव प्राप्त होण्याकरितां नानात्वाला कारण जें स्वस्वरूपाचें अज्ञान व तज्जन्य जो देहाहंकार यांचा नाश व्हावा लागतो. उदाहरणार्थ, स्वप्न व स्वप्नांतील नानात्व नष्ट होण्याकरितां झोंप नष्ट होऊन जागृति प्राप्त व्हावी लागते. हें स्पष्ट होण्याकरितां मी आपणांस एक दृष्टान्त देतों.

एक गृहस्थ ब्रह्मचर्यांतूनच संन्यासी झाले होते. त्यांचा एकदां मुक्काम जेथें गांवांतील सर्व लग्नांच्या अक्षति येतात अशा पुण्यांतील कसबा गणपतीसारख्या गणपतीच्या देवळांत पडला. संन्यासी-महाराज मोठे व्रतस्थ व खरे नैष्ठिक ब्रह्मचारी होते; परंतु मन ही चीज अशी आहे कीं, ती काय घडवून आणील याचा नियम नाहीं. मनुष्य स्वतः चांगला सुखवस्तु असतो; परंतु कित्येक वेळां दुसऱ्यांचें कसें होईल ह्याचाच तो विचार करीत बसतो. तद्वतच या संन्यासीमहाराजांच्या मनांत त्या सर्व लग्नांच्या अक्षति पाहून असें आलें कीं, अशा या महा-गाईच्या व दुष्काळाच्या दिवसांत या लग्न करणाऱ्या लोकांचा प्रपंच सुखानें चालणें मोठें मुष्कीलीचें आहे. असा विचार डोक्यांत घोळत असतांनाच त्यांना झोंप लागली. 'आणि जागता जंव असिजे । तंव जेणें ध्यानें भावना भाविजे । डोळां लागतखेंवो देखिजे । तेंचि स्वप्नीं ॥' (ज्ञा. ८–७३). या न्यायानें त्यांना विचित्र स्वप्न पडलें. तें असें कीं, त्यांचेंच लग्न ठरलें व त्यांची लग्नाची मिरवणूक, बत्त्या, घोडे, ब्यँड व भर जरीचा पोषाख केलेल्या बायका व पुरुषांचा जमाव अशा लवाजम्यासह निघाली. पण योगायोग असा कीं, त्या मिरवणुकींतील एका हापटबारानें स्वामी एकदम दचकले व जागे झाले व पाहतात तों, लग्नसोहळा वगैरे कांहीं एक नसून आपण एकटेंच या देवळांत निजलेलें आहोंत, असें त्यांच्या प्रत्ययास आलें. सांगण्याचा अभिप्राय असा कीं, ज्याप्रमाणें हा निद्रेला वश्य झालेला स्वप्नद्रष्टा संन्यासी, स्वप्नां-

तील सर्व वस्तु आपणच स्वतः बनला व त्यांचा द्रष्टाहि तोच झाला. ( 'जैसा चेइला तो अर्जुना। म्हणे स्वप्नींची हे विचित्र सेना। मीचि जालों होतों ना। निद्रावशें ॥' ज्ञा. ९–२४६ ); त्याचप्रमाणें जीवात्मा हा जेव्हां अज्ञानरूपी निद्रेला वश होतो, त्या वेळीं तो आपल्या स्वस्वरूपाला विसरतो व तेव्हांच त्याला हें विश्वरूपी स्वप्न अनुभवास येतें व या विश्वांतील सर्व पदार्थ तोच बनतो व त्यांचा द्रष्टाहि तोच होतो. ( 'जैसे कां स्वप्नमोहा। तो एकाकी देखिजे बहुवा। तोचि पाडु आत्मया। स्मरणेंवीण असे ॥' ज्ञा. १४–८५; 'तरी अविद्येचिया निदा। विश्वस्वप्नाचा हा धांदा। भोगीत होता प्रबुद्धा। अनादि जो ॥' ज्ञा. १८–४०३ ). परंतु जागें झाल्यावर ज्याप्रमाणें स्वप्नांतील सर्व अनेकत्व मावळतें व आपलें एकत्वच आपल्या प्रत्ययास येतें, त्याचप्रमाणें आत्म-जागृति प्राप्त झाल्यानंतर अविद्यारूपी झोंप व जगद्रूपी स्वप्न व सर्व वैचित्र्य नष्ट होतें व सर्व विश्व आत्मस्वरूपच आहे अशी एकत्वाची प्रतीति येते. अशी एकत्वाची प्रतीति येणें ह्यालाच वस्तुतंत्र शरणागति म्हणतात व 'मां एकं शरणं व्रज' या पदानें भगवंत हीच शरणागति सांगतात.

या शरणागतींत माणसाकडून शारीरिक शरणागतीचें कर्म घडलेंच पाहिजे असें नाहीं. अशा या ज्ञानी भक्तानें जरी प्रत्यक्ष भजन न केलें तरी तें सहजच घडतें. या भक्ताकडून ज्या ज्या क्रिया होतात त्या सर्वांची गणना भक्तींतच होते. ( 'तो करी तेतुली पूजा। तो कल्पी तो जपु माझा। तो असे तेचि कपिध्वजा। समाधी माझी ॥' ज्ञा. १८–११८१ ). पेन्शन घेतलेला मनुष्य जरी घरीं स्वस्थ बसला, तरी त्याचें तें स्वस्थ बसणें ज्याप्रमाणें नोकरींतच गणलें जातें, त्याप्रमाणें ज्ञानी भक्तानें जरी भजन केलें नाहीं तरी त्याचें तें न करणें भजनांतच गणलें जातें. ( 'तैसी क्रिया कीर न साहे। तऱ्ही अद्वैतीं भक्ति आहे। हें अनुभवाचिजोगें नव्हे। बोला ऐसें ॥' ज्ञा. १८–११५१ ). वास्तविक ही अद्वैत-

भक्ति अथवा वस्तुतंत्र शरणागति म्हणजे परमात्म्याची सहजस्थिति आहे ('पैं माझिये सहजस्थिती। भक्ति नांव॥' ज्ञा. १८-११३). अशा या 'स्वस्वरूपानुसंधानाला' श्रीशंकराचार्यांनीं भक्ति असेंच म्हटलें आहे ('स्वस्वरूपानुसंधानं भक्तिरित्यभिधीयते।'-- विवेकचूडामणि-३४). या वस्तुतंत्र शरणागतींत कांहींच करावयाचें नसतें. परंतु हें फार कठिण आहे. कांहीं न करतां आत्मानुसंधानांत स्थित होऊन राहणें हें कांहीं सोपें काम नाहीं. आपलें जीवन उपाधीशीं म्हणजे स्थूलसूक्ष्मसंघाताशीं तादात्म्य करून चाललेलें असतें व यामुळें आपल्याकडून देहाहंकारपूर्वक सारखें कर्म घडतच असतें. ही शरणागति उपाधीचा त्याग करून अनुभवाच्या अंगानें वस्तुरूप होऊन राहण्यांत आहे. अशा अनुभवावर आलेला पुरुष कांहीं करावयास परमात्म्याहून वेगळा उरतच नाहीं ('आतां कर्ता कर्म करावें। हें खुंटलें तया स्वभावें। आणि करी जऱ्ही आघवें। तऱ्हीं अकर्ता तो॥' ज्ञा० ५-३७).

वास्तविक जीव हा परमात्म्याहून वेगळा नाहीं. ज्या वेळेस आत्मा हा अज्ञानाला वश होतो व तो आपल्या आत्मस्वरूपाला विसरून देहाशीं तादात्म्य करतो, म्हणजेच मी देह आहें असा अहंकार घेतो त्या वेळेस तो जीवत्वदशेला येतो ('ऐसें शरीराचि येवढें। जैं आत्मज्ञान वेगळें पडे। तैं माझा अंशु ऐसें आवडे। थोडेपणें॥' ज्ञा० १५-३४३). परंतु विचारानें त्यानें देहाहंकार टाकला कीं तो परमात्म्याशीं समरस होतो ('हा विचारूनि अहंकारु सांडिजे। मग असतीच वस्तु होईजे। तरी आपली स्वस्ति सहजें। आपण केली॥ ज्ञा० ६-७१). तेव्हां उपाधिदृष्ट्या जरी जीव हा अल्प दिसला तरी तो स्वरूपतः परमात्माच आहे. उदाहरणार्थ, सूर्य जरी पृथ्वीपासून त्र्याण्णव दशलक्ष मैल एवढ्या अंतरावर आहे तरी त्याचीं पृथ्वीवर येणारीं किरणें हीं सूर्यापासून भिन्न नसतात ('तेजाचा तेजौनि निघाला। परी तेजींचि असे लागला। तया रश्मी ऐसा भला। बोधु होआवा॥' ज्ञा० १४-

३८४ ). किंबहुना सूर्यकिरणांचें अस्तित्व हें सूर्यावरच अवलंबून असतें; तीं कधीं सूर्यास्त झाल्यानंतर सूर्याच्या मागें जुन्या बाजारांत माल खरेदी करण्याकरितां राहिलेलीं आपणांस दिसणार नाहींत (' तरि अस्तुगिरिचां उपकंठीं । रिगालिया रविबिंबापाठीं । रश्मी जैसे किरीटी । संचरती ॥ ' ज्ञा० १२–३५ ). किंवा तरंग अथवा लाट ही जरी समुद्राच्या पाण्यापासून अल्प व भिन्न भासली तरी ती पाणीरूपच आहे; तसेंच जीव जरी अल्प भासला तरी तो परमात्म्याला सोडून कधींच नाहीं. तात्पर्य, आत्मानात्मविवेकानें देहादि उपाधींशीं केलेलें तादात्म्य जीवानें टाकून, ' मी ब्रह्म आहें ' अशा दृढ अपरोक्षानुभवावर प्राप्त होणें व अशा अनुभवानें राहणें याचाच अर्थ परमात्म्याला शरणागति करणें असा आहे व अशा एकत्वाच्या अनुभूतीलाच वस्तुतंत्र शरणागति म्हणतात. भगवंतहि अर्जुनाला तूं अशा प्रकारें मला शरण ये असेंच सांगतात. ते म्हणतात, ' अर्जुना ! सोन्याचा मणि जसा सोन्याला शरण येतो किंवा लाट जशी पाण्याशीं शरण येते त्याप्रमाणें तूं मला ( अभिन्नत्वानें ) शरण ये (' सुवर्णमणि सोनया । ये कल्लोळु जैसा पाणिया । तैसा मज धनंजया । शरण ये तूं ॥ ' ज्ञा० १८–१४०० ).

नाहींतर वडवानळ समुद्रांतच राहतो, पण तो त्याचें रोज बारा गांव पाणी पितो ! त्याचप्रमाणें परमात्मा वेगळा व आपण वेगळे असें समजून त्याचे भाग पाडणें व परमात्म्याला परिच्छिन्न व भिन्न समजून त्याला शरणागति करणें ही खरी शरणागति ठरत नाहीं (' वांचूनि सागराचां पोटीं । वडवानळु शरण आला किरीटी । जाळूं न ठाके तया गोठी । वाळूनि दे पां ॥ ' ज्ञा. १८–१४०१ ). परमात्मा मीच आहे अशा समजुतीच्या अंगानें होणारी जी वस्तुतंत्र शरणागति तीच गीतेला अभिप्रेत आहे व अशी शरणागति केलीस म्हणजे ' मी तुला सर्व पापांपासून मुक्त करीन ' (' अहं त्वा सर्वपापेभ्यः मोक्षयिष्यामि '),

असें भगवंत प्रस्तुत श्लोकांत अर्जुनाला सांगतात. ह्याचें कारण असें आहे कीं, जीव परमात्म्याशीं अनुभवाच्या अंगानें समरस झाल्यानंतर त्या ठिकाणीं पापाला अथवा पुण्याला जागाच राहत नाहीं. पाप व पुण्य होण्याकरितां द्वैत लागतें. द्वैतानें गुणोत्कर्ष होत असतो व त्यानें पाप-पुण्य होतें; परंतु ज्ञात्याच्या अन्वय-बोधांत सर्व द्वैत नष्ट झालेलें असल्यामुळें त्याच्याहून वेगळें असें कर्म शिल्लकच राहत नाहीं. कर्ता ब्रह्मरूप झाला कीं, त्याच्या बोधांत कर्ता, कर्म व कार्य ही त्रिपुटी शिल्लक राहत नाहीं व म्हणून त्याच्या संघाताकडून जरी पापपुण्यात्मक कर्म घडलें तरी त्यानें तो बांधला जात नाहीं ( ' म्हणोनि कार्य कर्ता क्रिया । हें स्वरूपचि जाहालें जया । नाहीं शरीरादिकीं तया । कर्मीं बाधु ॥ ' ज्ञा. १८–४५३; ' म्हणोनि तयाची बुद्धी । नेणे पापपुण्याची गंधी । गंगा मीनलिया नदी । विटाळु जैसा ॥ ' ज्ञा. १८–४५०; ' तेथ सर्वबंधलक्षणें । पापें उरावें दुजेपणें । तें माझ्या बोधीं वायाणें । होऊनि जाईल ॥ ' ज्ञा. १८–१४१४ ). त्याच्या संघाताकडून होणारें सर्व कर्म ब्रह्मरूपच होतें ( ' ब्रह्मस्वरूपाचीं कर्में ब्रह्मरूप । विरहित संकल्प होती जाती ॥ ' तुका. ३७६८ ) यामुळें तें त्याला पुढच्या जन्माला कारणीभूत होत नाहीं.

तसेंच, जो पापपुण्यात्मक कर्माचा अहंकार व फलास्वाद घेतो त्यालाच पापपुण्याचें फल भोगावें लागतें. परंतु हा ज्ञानी पुरुष व्यापक बोधावर आला असल्याकारणानें परिच्छिन्न अवस्थेंत असणारें अहंकर्तृत्व व फलास्वादता हीं त्याच्या ठिकाणीं संभवत नाहींत. यामुळें त्याला पापपुण्याचीं जीं जन्ममृत्युरूपी फळें तीं भोगावीं लागत नाहींत. एवढेंच नव्हे तर, या पुरुषाचा अन्वयबोध येवढा मोठा असतो कीं, त्याच्या संघाताकडून जीं कर्में होतात त्याची त्याला खबरीह नसते ( ' यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते । हत्वाऽपि स इमाँल्लोकान्न हंति न निबद्ध्यते ॥ ' गीता १८–१७ ). त्याला सर्वत्र एक परमात्माच प्रतीत होतो.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.



क्रमांक ... नों. दि. ...

तलवार म्यानांत घालून टांगून ठेवली व फक्त दसऱ्याच्याच दिवशीं ती बाहेर काढली तरी तिला गंज चढण्याचा संभव असतो. परंतु तिला परिसाचा स्पर्श झाल्यानंतर ती जरी मातींत पुरून ठेवली तरी तिला गंज चढत नाहीं. तद्वतच ज्या पुरुषाच्या वृत्तीला परमात्म्याचा स्पर्श झाला म्हणजेच जो वृत्तीनें परमात्म्याशीं समरस झाला, त्याच्या संघाताकडून जरी पापपुण्यात्मक कर्में घडलीं तरी त्यांची त्याला बाधा होत नाहीं ( ' लोह उभें खाय माती । तें परिसाचिये संगती । सोनें जालया पुढती । न शिविजे मळें ॥ तैसें अद्वयत्वें मज । शरण रिघालिया तुज । धर्माधर्म हे सहज । लागतील ना ॥ ' ज्ञा. १८–१४०७; ०९ ). ज्ञानी पुरुषाकडून पाप-पुण्यात्मक कर्म घडतच नाहीं, कारण ज्या ठिकाणीं सर्व कर्मांचा लय होतो, ती वस्तु तो अनुभवानें बनलेला असतो. ( ' सर्वारंभा उटकलें । प्रवृत्तीचें तेथ मावळे । जळती गा कर्मफळें । ते तो आगी ।।' ज्ञा. १४–३६६ ). त्याच्या ठिकाणची जीवत्वदशा संपूर्णतया नष्ट होते. उदाहरणार्थ, सूर्याचा उदय झाला म्हणजे ज्याप्रमाणें अंधकार नाहींसा होतो किंवा एखाद्या सामान्य स्त्रीचा जर राजानें अंगीकार केला, मग ती जरी बटीक असली तरी ती जशी राजाच्या बरोबरीची होते, त्याचप्रमाणें अनुभवाच्या अंगानें जो परमात्म्याशीं समरस झाला त्याची जीवत्वदशा नष्ट होऊन तो साक्षात् परब्रह्मरूपतेला प्राप्त होतो ( ' अगा प्राकृताहि राया । आंगीं पडे जें धनंजया । तें दासिरूंहि कीं तया । समान होय ॥ मा मी विश्वेश्वरु भेटे । आणि जीवग्रंथी न सुटे । हे बोल नको वोखटे । कानीं लाऊं ।।' ज्ञा. १८–१४०३,०४ ). हें सर्व केवळ एका आत्मज्ञानानेंच होत असल्यामुळें भगवंत प्रस्तुत श्लोकांत अर्जुनाला सांगतात कीं, ' तूं मला वस्तुतंत्र रीतीनें शरण ये म्हणजे मग तूं पापपुण्याच्या अतीत होशील व द्वैतच न उरल्यानें शोकमुक्त होशील. म्हणून तूं शोक करूं नकोस ' ( ' मा शुचः ' गीता १८–६६ ).

अशाप्रकारें अन्वय बोधावर येऊन शरीराकडून योग्य कर्म घडत राहणें, या स्थितीला गीताकार ' समाधि ' म्हणतात. ह्या स्थितींत

बुद्धीचा कर्तव्याकर्तव्याच्या बाबतींत तोल नाहींसा होत नाहीं व आत्मज्ञानानें शरीरादि स्थूलसूक्ष्म संघाताशीं असणारें तादात्म्य नष्ट झालेलें असल्यामुळें संघाताकडून कर्म होत असतांनाहि त्या ज्ञानी पुरुषाचे ठिकाणीं तें ' मी करतों ' ही बुद्धि नसते व म्हणून त्याला पाप व पुण्य लागत नाहीं व यामुळें तो जन्ममृत्यूच्या अतीत होतो.

तात्पर्य, भगवंत या श्लोकांत अर्जुनाला धर्माधर्मांच्या म्हणजेच पापपुण्याच्या, जन्ममृत्यूच्या व शोकाच्या अतीत होण्याचा मार्ग सांगतात व तो म्हणजे भगवंताला वस्तुतंत्र शरणागति करणें हाच होय. कारण ' तरति शोकमात्मवित् ' व ' ज्ञानादेव तु कैवल्यम् ' असा अध्यात्मशास्त्राचा सिद्धान्त आहे. जन्ममृत्युरूप दुःखाचें मूळ कारण जें अज्ञान त्याचा नाश करून जीवाला निरतिशयानन्दावाप्तिरूप मोक्षाची प्राप्ति करून देणारें असें केवळ एक आत्मज्ञानच आहे (' इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः । ' गीता १४–२; ' जें ज्ञान जयाच्या हातीं । तोचि समर्थु मुक्ती । ' ज्ञा. १५–३० ). हें ज्ञान भगवंताच्या कृपेनेंच प्राप्त होतें. जो भक्त ईश्वरार्पण बुद्धीनें आपलें स्वकर्म करीत राहतो त्याच्यावरच भगवंत प्रसन्न होऊन त्याला आत्मविषयक बुद्धि देतात ( ' तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् । ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति ते ॥' गीता १०-१०) व त्यामुळें भक्ताला आत्मैक्य-अनुभवस्थिति प्राप्त होते व तो शोकमोहातीत होतो. सारांश, अशी ब्राह्मी स्थिति प्राप्त व्हावी असें ज्याला वाटत असेल त्यानें आपलें विहित कर्म ईश्वरार्पण बुद्धीनें करीत राहणें हेंच श्रेयस्कर ठरतें ( 'हें विहित कर्म पांडवा । आपुला अनन्य वोलावा । आणि हेचि परम सेवा । मज सर्वात्मकाची ॥ ' ज्ञा. १८–९०६ ).

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. 
२८५० 
अनुक्रमांक ... नों. दि.

REFBK-0017750